देवा तुझे नाम हीच माझी पूजा
नाही मनी शब्द कोणताही दूजा...

रिता माझा हात तरी तुझी साथ
नाही धूप दिवा नाही गंधफूल
तरी मानस पूजा स्वीकारावी...

भौतिक ऐश्वर्य वाटे आता गौण
देवा तुझे दर्शन करी शब्द मौन
तरी निशब्द पूजा स्वीकारावी...

अद्वैत संपू दे ही एकच विनंती
देहाची काळजी घेते नित् सृष्टी
तरी अकर्म पूजा स्वीकारावी...